# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

परिपत्रक क्र. १६८ /२०२२

विषय : निवड समितीने शिफारस करून नियुक्त केलेल्या उमेदवारांचे शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव विहित मुदतीत सादर करण्याबाबत...

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी नियुक्त करून शिफारस केलेल्या उमेदवारांना कायमस्वरूपी/शैक्षणिक वर्षासाठी शिक्षक मान्यता शैक्षणिक विभागाकडून देण्यात येते. यासंदर्भात अध्यापकांना परिनियम क्र. ४१५ मध्ये महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांमधील रिक्त शिक्षकी पदे कायमस्वरूपी भरण्याची तरतुद केलेली आहे व अपवादात्मक परिस्थितीत तात्पुरत्या स्वरूपामध्ये जी रिक्त पदे भरावयाची आहेत त्याबाबतची तरतुद परिनियम क्र. ४१५ (३) मध्ये केलेला आहे.

यासंदर्भात शैक्षणिक वर्ष २०२२–२३ या वर्षासाठी निवड समितीमार्फत नियुक्त केलेल्या उमेदवारांचे निवड समिती अहवाल, शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव खालीलप्रमाणे शैक्षणिक विभागाकडे (मान्यता कक्ष) सादर करण्यात यावेत.

**व्यावसायिक अभ्यासक्रम**

१. शैक्षणिक वर्ष २०२२–२३ मध्ये सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थांनी विद्यार्थी संख्येनुसार कार्यभार तपासून घेऊन विहित प्रक्रियेचा अवलंब करून नियमित पदे भरण्याची कार्यवाही करावी. केवळ अपवादात्मक परिस्थितीत तात्पुरत्या स्वरूपामध्ये स्थानिक निवड समितीद्वारे नेमणूक केलेल्या शिक्षकांचे शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव दि. ०१ जुलै, २०२२ ते दि. ३१ ऑक्टोबर, २०२२ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने भरून आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाकडे (मान्यता कक्ष) सादर करणे आवश्यक आहे.

२. महाविद्यालये/परिसंस्थाकडून ज्या उमेदवारांची २०२२–२३ या शैक्षणिक वर्षासाठी निवड समितीमार्फत निवड करून विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर केला असेल असे उमेदवार किंवा ज्यांना शिक्षक मान्यता मिळाली असेल असे अध्यापक त्यांनी कोणत्याही कारणात्सव महाविद्यालये/परिसंस्था सोडली असेल तर अशा उमेदवारांना शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने भरण्यासाठी शैक्षणिक विभागातील संबंधित अधिकाऱ्यांची मान्यता घेऊन संबंधित महाविद्यालयापुरतेच (सोडून गेलेल्या अध्यापकांना संबंधित महाविद्यालयाने/परिसंस्थेने कार्यमुक्त केल्याचे रितसर पत्र असेल तरच) संकेतस्थळावरील लिंक खुली करण्यात येईल.

३. संबंधित संस्था/महाविद्यालयांनी खालीलप्रमाणे स्वतंत्र संचिकेमध्ये शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव सादर करावेत.

अ) सहायक प्राध्यापक
ब) सहयोगी प्राध्यापक
क) प्राध्यापक

**अव्यावसायिक अभ्यासक्रम.**

१. सर्व अशासकिय अनुदानित तसेच विनाअनुदानित महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०२२–२३ मध्ये विद्यार्थी संख्येनुसार कार्यभार तपासून घेऊन विहित प्रक्रियेचा अवलंब करून नियमित पदे भरण्याची कार्यवाही करावी. केवळ अपवादात्मक परिस्थितीत तात्पुरत्या स्वरूपामध्ये स्थानिक निवड समितीद्वारे नेमणूक केलेल्या अध्यापकांचे शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव दि. ०१ जून, २०२२ ते दि. ३० सप्टेंबर, २०२२ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने भरून आवश्यक त्या सर्व कादगपत्रांसह विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाकडे (मान्यता कक्ष) सादर करणे आवश्यक आहे.

२. महाविद्यालये/परिसंस्थाकडून ज्या उमेदवारांची २०२२–२३ या शैक्षणिक वर्षासाठी निवड समितीमार्फत निवड करून विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर केला असेल असे उमेदवार किंवा ज्यांना शिक्षक मान्यता मिळाली असेल असे अध्यापक त्यांनी कोणत्याही कारणास्तव महाविद्यालये/परिसंस्था सोडली असेल तर अशा उमेदवारांना शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने भरण्यासाठी शैक्षणिक विभागातील संबंधित अधिकाऱ्यांची मान्यता घेऊन संबंधित महाविद्यालयापुरतीच (सोडून गेलेल्या अध्यापकांना संबंधित महाविद्यालयाने/परिसंस्थेने कार्यमुक्त केल्याचे रितसर पत्र असेल तरच) संकेतस्थळावरील लिंक खुली करण्यात येईल.

३. संबंधित संस्था/महाविद्यालयाने विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर करण्यापूर्वी प्रस्तावासोबत निवड समितीचा अहवाल, नेमणूक आदेश, रूजू अहवाल, शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे, कोणत्याही कारणाने नाव बदलले असेल तर नाव बदलाचे प्रमाणपत्र तसेच मागास प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत त्यांचे जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र तसेच उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (नॉन क्रिमीलियर) जोडले असल्याबाबतची खात्री करावी. तसेच प्रस्तावासोबत जोडलेल्या सर्व कागदपत्रांवर प्राचार्यांची मूळ सही व शिक्का असणे आवश्यक आहे.

४. अपूर्ण व त्रुटी असलेल्या प्रस्तावांवर कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही. तसेच याबाबत कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही याची सर्व संस्था/महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.

Rahul 8/6/2022

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव
शैक्षणिक विभाग (शिक्षक मान्यता कक्ष)

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७. )
जावक क्र. सीसीओ/1755 )
दि. 08/06/2022. )

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था
पुणे/अहमदनगर/नाशिक